# गणेशोत्सवाची रूढी



भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणपतीची मृत्तिकेची प्रतिमा पूजावी. या देवतेला दूर्वा व मोदक फार प्रिय असल्यामुळे ते समर्पण करावे. शक्य त्यानुसार नवविद्या भक्तीच्या प्रकारांनी त्याला संतुष्ट करावे. गणपतीचे विसर्जन दीड, पाच, सात, दहा किंवा एकवीस दिवसांनी करावे. विसर्जन होईपर्यंत उत्सव चालू ठेवावा. उत्तरपूजेनंतर प्रतिमा जलांत विसर्जन करावी. असा हा वार्षिक गणपतिपूजेचा शास्त्रोक्त विधी आहे. गणेशचतुर्थी पाळण्याची पद्धती प्रामुख्याने विंध्याद्रीच्या दक्षिणेस आहे. दक्षिण देशातून जे लोक उत्तरेकडील प्रदेशात गेले, त्यांच्यातही हा उत्सव चालू आहे.

महाराष्ट्रातील काही भागात या दिवशी कागदावर किंवा चंदनाने तात्पुरते काढलेले गणपतीचे चित्रच पूजले जाते. अन्यधर्मीयांच्या जाचामुळे देशत्याग करून रानोमाळ पळून जाण्याचा प्रसंग आल्यामुळे आपले धार्मिक विधी रक्षण करून ठेवण्यासाठी या प्रकाराचा पूर्वजांनी अवलंब केला असावा. तोच कुलाचार अद्याप कोकणातील काही भागात दृष्टीस पडतो. कित्येक या चित्रांशिवाय मृत्तिकेच्या प्रतिमेचीही स्थापना करतात. तृतीयेच्या दिवशी शंकर व गौरीची चित्रे पुजण्याची चाल काही ठिकाणी आहे. कोकण, महाराष्ट्र व मुंबई या ठिकाणी सप्तमीपासून नवमीपर्यंत मोठ्या थाटाने ज्येष्ठा गौरीचा उत्सव साजार होत असून गौरीगणपतीचे एकाच दिवशी विसर्जन करण्यात येते.

बंगालमध्ये गणपतीचा उत्सव रूढ नाही, परंतु दुसऱ्या दोन शिवगणांची पूजा करण्यात येते. फाल्गुन शुद्ध चतुर्दशीस घंटाकर्ण नावाच्या गणाची पूजा होते. हा गण अप्रतिम सुंदर असल्यामुळे त्याच्या पूजनाने सौंदर्य प्राप्त होते अशी तेथील लोकांची समजूत आहे. या गणाचा द्योतक म्हणून एका पाण्याने भरलेल्या घटाची पूजा केली जाते. याच महिन्यात घेंटू नांवाच्या दुसऱ्या एका गणाची पूजा करून त्वग्रोगापासून आपले रक्षण करण्याबद्दल त्याची प्रार्थना केली जाते. द्रविड देशांत रामेश्वरापर्यंत गणेशोत्सव साजरा केला जातो. तो साजरा करण्याची पद्धती स्थलपरत्वे भिन्न आहे. कानडी लोक गणेशचतुर्थीस बेनकन हब्ब आणि तेलगू पिल्लेयर चवती असे म्हणतात. पिल्लेयर हे त्या लोकांनी गणपतीस दिलेले नाव आहे. तेथील लोकांचा असा समज आहे की ब्राह्मणाचे आराध्यदैवत शंकर, क्षत्रियांचे विष्णू, वैश्याचे ब्रह्म आणि शूद्राचे गणपती होय. गणपतीची पूजा चतुर्थ वर्णातील लोक देखील आस्थेने करीत असतात. यावरून तेथील लोकांचा हा समज झाला असावा. मुंबई, पुणे वगैरे प्रसिद्ध ठिकाणी चित्रांचे सार्वजनिक देखावे या प्रसंगी दाखविले जातात.

गुजराथेत गणेशचतुर्थीचा उत्सव पाळण्यात येत नाही. या दिवशी गूळ व तूप घालून तयार केलेल्या बाजरीच्या पिठाच्या गोळ्या घरात जागोजागी ठेवतात. त्या उंदीर खाऊन टाकतात. गणपतीच्या दिवशी त्याच्या वाहनास याप्रमाणे मान देण्याची रूढी का पडली हे नकळे. काठेवाडांत घरोघरी गणपतीची मूर्ती असते. वैशाख शु।।4 स तूप व शेंदुराने मूर्तीचे पूजन करून नैवेद्य दाखवितात. महाराष्ट्राप्रमाणे नवीन मूर्ती आणून तिची पूजा करण्याचा किंवा हा दिवस सणांप्रमाणे पाळण्याचा प्रघात उत्तरेकडे आढळत नाही.



(आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास पुस्तकातून साभार)

## इच्छित फळ देणारा गणेश



आजच्या युगात व्यक्तीच्या अपेक्षा, महत्वाकांक्षा दिवसेंदिवस वाढतच आहेत. या इच्छापूर्तिसाठी शास्त्रात 'कलो चंडी विनायका'...ची पूजा करावी असे म्हटले आहे. अर्थात कलियुगात चंडी किंवा विनायक लवकर इच्छित फळ देणारा देव आहे. वक्रतुंडाच्या पूजेशिवाय कोणत्याही शुभ कार्याची सुरवात होत नाही. त्यांच्या प्रार्थनेशिवाय कोणतेही आध्यात्मिक कार्य सफल होत नाही.

सनातन धर्माच्या प्रत्येक व्यक्तीकडून त्यांची पूजा नेहमी केली जाते. गणेशाच्या मूर्तीची अनेक रूपे आहेत. दुसऱ्या कोणत्याही देवाची इतकी रूपे नाहीत, हे त्याचे वैशिष्ट्य आहे. स्वस्तिकाचे रूपही संकटनाशक आहे. तो सर्व मानवाच्या सांसारीक व आध्यत्मिक कल्याणाचे प्रतीक आहे. रिद्धी सिद्धी, लाभ-शुभ, स्वस्तिक, ॐ, कलश, त्रिशूळ, अंकुश, सुपारी, श्रीफळ, संपत्ती किंवा संतान प्राप्तीसाठी व्यक्तीने जलत्व उपासना केली पाहिजे. जलत्वाची आवश्यकता असणाऱ्या व्यक्तीसाठी भगवान एकदंत प्राणदेवता आहे असे शास्त्रात सांगितले आहे. याची सगुण-निर्गुण अशा दोन्ही प्रकारे उपासना करू शकता.

उपासकाने गणेश मूर्ती घरात इशान्य कोनात पूजेच्या ठिकाणी ठेवावी. मूर्ती एक इंचापेक्षा मोठी किंवा बारा इंचापेक्षा लहान नसावी. गणपतीचे तोंड पश्चिम दिशेला करून उपासना करावी. पूजेमध्ये रवा, फुले, दुर्वा, शत पत्रे व मोदकाचा उपयोग करावा.

निर्गुण उपासनेत रवा, फुले उपासकाचा दृढविश्वास, दुर्वा सुख दु:खाच्या भावना, शतपत्रे ब्रम्हदेवाला प्राप्त करण्यासाठी आणि मोदक आनंदाचे प्रतीक आहेत. गणेशाची स्तुती करण्यासाठी सर्व देवता, ऋषी, आचार्यांनी मंत्र, स्त्रोत, नामाची रचना करून त्यांचे गुणगान गायिले आहे. त्याचे विभाजन सहा वगवेगळ्या संप्रदायात केले आहे. त्यांचे वर्णन खालील प्रमाणे

1. महागणपती संप्रदाय 2. हरिद्रा गणपती संप्रदाय 3. उच्छिष्ट गणपती संप्रदाय 4. नवनीत गणपती संप्रदाय 5. सुवर्ण गणपती संप्रदाय 6. संतान गणपती संप्रदाय.

पहिल्या संप्रदायाचा उपयोग साधारणत: महाविद्या साधनेसाठी केला जातो. द्वितीय, तृतीय गणपती संप्रदाय तांत्रिक क्रियाशी संबंधित आहे. शेवटचे तीन संप्रदाय गणेश प्रेमी प्राण्यांसाठी आहे. त्याचे वर्णन गणेश पुराणातील प्राण रूपात आहे. सामान्यांसाठी गणपतीचे बारा नावेच पुरेशी आहेत.